**आदेश अर्ज नि.क्र.२८ (१)** नियमीत दिवाणी दावा क्रमांक **५५/२०१७**
श्रीमती कल्पना सानप + २ वि. महादेव सानप + २२

सीएन्आर क्रमांक एम्एच् आरजी ०९०००६०२-२०१७
दाखल केल्याची तारीख : **१८.०४.२०१८.**
आदेश तारीख : **२३.०४.२०१८.**
कालावधी : **०५** दिवस.

**<u>अर्ज निशाणी क्रमांक २८ वर आदेश</u>**
(पारीत केल्याची तारीख **२३.०४.२०१८**)

**०१.** प्रस्तुत अर्ज प्रतिवादी क्रमांक ०१ ने त्याच्याविरुद्ध वादपत्रावर दिनांक २१.०८.२०१७ रोजी झालेला ''विना कैफियत'' आदेश रद्द करण्यासाठी **<u>दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०</u>** नुसार दाखल केला आहे.

**०२.** वादींनी म्हणणे दाखल करुन प्रतिवादी क्रमांक ०१ ने तो आजारी होता असा पुरावा दाखल केला नाही म्हणून अर्जास हरकत घेतली.

**०३.** प्रतिवादी क्रमांक ०१ तर्फे विधीज्ञ श्री. एन्. टी. रातवडकर युक्तीवादास गैरहजर. वादीतर्फे विधीज्ञ श्री. एम्. डी. पाटील यांचा युक्तीवाद ऐकला.

**०४.** प्रतिवादी क्रमांक ०१ ला दिनांक २७.०७.२०१७ रोजी समन्स बजावणी झाली आहे. प्रतिवादी दिनांक **०९.०८.२०१७** रोजी हजर होवूनही त्याने मुदतीत कैफियत दाखल केली नाही. म्हणून त्याच्याविरुद्ध वादपत्र **<u>नि.क्र.०१</u>** वर दिनांक **२१.०८.२०१७** रोजी दावा ''विना कैफियत'' चालवण्याचा आदेश पारीत झाला आहे.

**०५.** दावा स्थावर मिळकतीबाबत आहे. प्रतिवादी क्रमांक ०१ ला कैफियत दाखल करण्याची संधी नाकारल्यास त्याचे नुकसान होईल. प्रतिवादी क्रमांक ०१ ला दाव्यामध्ये कैफियत दाखल करुन बचाव मांडण्याची संधी दिल्यास वादाचे कायमपणे निराकरण होण्यास मदत होईल. वादींचे त्यामुळे कोणतेही नुकसान संभवत नाही.

**०६.** म्हणून प्रतिवादी क्रमांक ०१ विरुद्ध **दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०** नुसार दावा **''विना कैफियत''** चालवण्याचा झालेला आदेश रद्द करणे उचित होईल. प्रतिवादी क्रमांक ०१ ने हजर होवूनही कैफियत न दाखल केल्यामुळे दावा निकाल होण्यास विलंब झाला आहे. म्हणून प्रतिवादी क्रमांक ०१ वर खर्च लादणे गरजेचे आहे. म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येतो.

## आ दे श

**०१.** प्रतिवादी क्रमांक ०१ चा अर्ज **नि.क्र.२८** मंजूर करण्यात येतो.

**०२.** वादपत्र **नि.क्र.०१** वर प्रतिवादी क्रमांक ०१ विरुद्ध दावा ''विना कैफियत'' चालवण्याचा झालेला आदेश त्याने वादींना रक्कम रुपये २,०००/- खर्च देण्याच्या अटीवर **दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ चा क्रम ०८ नियम १०** नुसार रद्द करुन त्यांची कैफियत अभिलेखावर सामील करुन घेण्यात येते.

**०३.** अर्जाचा खर्च दाव्यात समावीष्ट करण्यात येतो.

**---स्वाक्षरी---**
**(सुभाष ल. फुले)**
**(एम एच आर जी ०००९ - २१२५)**
**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर, रोहा.**
**जिल्हा रायगड**

**स्थळ : रोहा**
**दिनांक : २३.०४.२०१८**